**<u>भुसपांदन अर्ज नं. ८१/२००४ या प्रकरणात मोबदला रक्कम मिळणेकामी दाखल केलेल्या एलआरएमए नं. ४७/२०२२ अर्जामधिल नि.क्र. १ वरील आदेश</u>**

**१.** अर्जदारांचा अर्ज, सामनेवाले नं.१ व २ यांचा त्यावरील जबाब तसेच संबंधीत अधीक्षक/रीट क्लर्क यांनी सादर केलेला रिपोर्टचे अवलोकन केले. अर्जदारांनी या जमीन निर्देशन अर्जातील ॲवार्डची प्रत न्यायालयाच्या अवलोकनार्थ दाखल केलेली आहे. अर्जदारांनी जमा असलेली रक्कम मिळण्याबाबत विनंती केली आहे.

**२.** सहा. अधिक्षक (वित्त) यांनी सादर केलेल्या दि. २४.११.२०२२ च्या रिपोर्टनुसार रक्कम रु. १३,६४,०००/- वित्त विभागात 'क' नं.२५० ला दि.१०.०८.२०२२ रोजी जमा आहे असे दिसून येते. सदर रक्कम मुदत ठेवीमध्ये ठेवण्यात आली होती व सदर मुदत ठेव मोडल्यानंतर रक्कम रू. १३,८८,७२०/- ही नविन 'क' नं. २२१ ला दि. ०७/०७/२०२३ रोजी जमा असल्याबाबत दि. ०७.०७.२०२३ रोजीच्या अहवालानुसार स्पष्ट होते. रीट क्लर्क यांचेकडील दि.०३.१२.२०२२ च्या अहवालानुसार सामनेवाले यांनी न्यायालयाचे आदेशाविरूध्द मा.उच्च न्यायालयात अपील दाखल केल्याचे आढळून येत नाही. तसेच, अर्जदाराने प्रतिज्ञापत्र सादर करुन प्रस्तुत जमीन निर्देशन अर्जात वरिष्ठ न्यायालयात अपील दाखल नाही असे शपथेवर कथन केले आहे.

**३.** या प्रकरणातील मुळ अर्जदार भवान अर्जुन शिंदे हे दि. ०८.०३.२०२१ रोजी मयत झालेले असून त्यांचे त्यांचे कायदेशीर वारस देखील प्रस्तुत मोबदला अर्जाचे अर्जदार आहेत. तसेच अर्जदार क्र. १.५ भागुबाई भवान शिंदे हया देखील दि. १५/०५/२०२१ रोजी मयत झालेल्या असून ते दोघेही मयत असल्याबाबत त्यांचा मृत्युचा दाखला अर्जदारांनी दाखल केलेला आहे. त्याप्रमाणे अर्जदारांनी मयतांचे वारस प्रमाणपत्र (नि. क्र. ११) प्रमाणे दाखल केलेले आहे. सदर वारस प्रमाणपत्र विचारात घेवून अर्जात नमुद वारसदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याचे दिसते. अशा परिस्थितीत, अर्जदार हे या जमीन निर्देशन अर्जातील न्यायनिर्णयानुसार मोबदल्याची रक्कम मिळण्यास पात्र ठरतात.

**४.** या प्रकरणात स्थगिती आदेश आढळून येत नाही मात्र तरीही भविष्यात मा.उच्च न्यायालय अथवा मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेशीत केल्यास सदर रक्कम न्यायालयात जमा करण्याचा हमी बॉण्ड सादर करणे आवश्यक आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत -

## <u>आदेश</u>

**(१)** अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

**(२)** सहा. अधिक्षक (वित्त) यांनी दिलेल्या रिपोर्टनुसार या प्रकरणात जमा असलेली भुसपांदन मोबदल्याची रक्कम **रु.१३,८८,७२०/- ही मोबदला रक्कम अर्जातील नमुद मुळ अर्जदार क्र. १.१ ते १.४** यांना त्यांची ओळख शाबीत केल्यानंतर त्यांचे बॅन्क खात्यावर अदा करण्यात यावी.

**(३)** अर्जदारांना असे आदेशीत करण्यात येते की, सामनेवाले क्र.१ व २ यांनी मा.उच्च न्यायालय अथवा मा.सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केलेले असल्यास सदर अपीलातील आदेशाव्दारे वरील अर्जदार यांना रक्कम परत करण्याचा आदेश झाल्यास सदर रक्कम न्यायालयात भरणा करतील अथवा अर्जदारांव्यतिरिक्त इतर इसमांनी या रकमेवर हक्क असल्याचे सांगितल्यास सदरची रक्कम अर्जदार त्यांना परत करतील असा हमी बॉण्ड त्यांनी न्यायालयास सादर करावा.

**( र. श्री. करंकाळ )**
**दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर**
**<u>नाशिक</u>**

**दि.१२.०७.२०२३.**